# पेरणीसाठी मान्सूनच्या पावसाकडे लागल्या अनेकांच्या नजरा

## यंदा कोणते नक्षत्र बरसणार?



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.१०)**– जिल्ह्यात यंदाच्या खरिपात सोयाबीन, तूर, कापूस व अन्य पिकांची लागवड होणार आहे. मे महिन्यापासून अवकाळी पाऊसाचे थैमान घातले असताना रविवार ८ जूनपासून मृग नक्षत्राला प्रारंभ झाला. शेतीची तयारी अंतिम टप्प्यात आहेत. पेरणीसाठी मान्सूनच्या पावसाची प्रतीक्षा होत आहे. यंदा कोणते नक्षत्र बरसणार या चर्चांना उधाण आले आहे. हवामान खात्याच्या अंदाजाकडे शेतक?यांच्या नजरा लागल्या आहेत. यंदा मान्सूनपूर्व पावसामुळे जमीन ओलीचिंब झाली असली तरी, पेरणी कधी करावी आणि शेतीची कोणती कामे कोणत्या नक्षत्रात करावीत. यासाठी जिल्ह्यातील शेतकरी आजही नक्षत्रांवरच अधिक विश्वास ठेवून आहेत. ते परंपरा जपत पेरणीचा मुहूर्त साधतात. 'मृगाची पेरणी, – धनधान्य देई' ही परंपरा याही वर्षी कायम राहील, असे बोलले जात आहे.

**अशी आहेत यंदाची नक्षत्रे**

| दिनांक | नक्षत्र | वाहन |
|---|---|---|
| ८ जून | मृग | कोल्हा |
| २२ जून | आद्रा | उंदिर |
| ५ जुलै | पुनर्वसू | घोडा |
| १९ जुलै | पुष्य | मोर |
| २ ऑगस्ट | आश्लेषा | गाढव |
| ६ ऑगस्ट | मेघा | बेडूक |
| ३० ऑगस्ट | पूर्वा | म्हैश |
| १३ सप्टेंबर | उत्तरा | कोल्हा |
| २७ सप्टेंबर | हस्त | मोर |
| १० ऑक्टोबर | चित्रा | हत्ती |
| २४ ऑक्टोबर | स्वाती | बेडूक |

# पुसला दवाखान्यात 'ताला ठोको' आंदोलन लेखी आश्वासनानंतर स्थगित



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,(दि.१०)** – पुसला येथे कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याच्या मागणीसाठी युवा मित्र मंडळ पुसला यांच्या वतीने आज 'ताला ठोको' आंदोलन करण्यात आले. अध्यक्ष सुरज धर्मे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन छेडण्यात आले. याआधीही अनेक वेळा निवेदन देण्यात आले होते, मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस अंमलबजावणी न झाल्याने अखेर हे तीव्र आंदोलन छेडले गेले.

आंदोलनाच्या दरम्यान शे. घाट पोलीस स्टेशन व पशुवैद्यकीय विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मध्यस्थीने आंदोलकांना समज देण्यात आली. त्यानंतर आंदोलकांना लेखी आश्वासन देण्यात आले. या पत्रात नमूद करण्यात आले की, शासन आदेशानुसार पवैद श्रेणी–२ पुसला दवाखाना आता श्रेणी–१ मध्ये अपग्रेड झाला आहे. मात्र, या पदासाठी अधिकारी एमपीएससीद्वारेच भरती होणार असल्याने तोपर्यंत कायमस्वरूपी अधिकारी मिळणे शक्य नाही. त्यामुळे दवाखाना अतिरिक्त कार्यभाराच्या माध्यमातून सुरु ठेवण्यात येईल.

पावसाळा जवळ येत असल्याने पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, ही जाणीव आंदोलकांनी अधिका?यांना करून दिली. त्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात कार्यभाराची नवी व्यवस्था जाहीर करण्यात आली. मंगळवार आणि शनिवार – डॉ. पी. एम. बोबडे, सोमवार, बुधवार, गुरुवार – सविता खनखने आणि शुक्रवार – प्रविण शिरसाट हे अधिकारी सेवा देतील, अशी लेखी हमी देण्यात आली. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी युवा मित्र मंडळ पुसलाचे अध्यक्ष सुरज धर्मे, उपाध्यक्ष जावेद शेख, धिरज सावरकर, कमलेश खपरीये, महेश ठाकरे, सुनील चिमोटे, गजानन गुल्हाने, राजू फरतोडे, आकाश गजबे, विरेंद्र सोळंकी, सागर श्रीराव, शरद वरुडकर, अंकुश कुंभारे, सागर धर्मे, अतुल ठाकरे, विजय शिरभाते, नितीन भोंडेकर, अनिल चवरे, निखिल ढोरे, निखिल श्रीराव, महेश कुहीटे, अंकित राऊत,अक्षय राऊत, गोलु तायवाडे, योगेश गजबे, फुरकान नाईक, अनिकेत कारणकर, कमलेश राऊत आदी उपस्थित होते.

# गरजू विद्यार्थ्यांना ४१३४० प्रो बुक-रजिस्टरचे वाटप

## अर्हम युवा सेवा ग्रुपचा स्तुत्य उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.१०)** – राष्ट्रसंत नम्र मुनि महाराज यांच्या प्रेरणेतून 'अर्हम युवा सेवा ग्रुप'तर्फे गेल्या काही वर्षांपासून 'पस्ती से पुस्तक' या रद्दी संकलनातून शैक्षणिक सहाय्य उपक्रम राबवला जात आहे. यामध्ये नागरिकांकडून जमा झालेल्या रद्दीच्या मदतीने गरजू विद्यार्थ्यांना 'प्रो बुक' दर्जेदार वह्यांचे अत्यल्प दरात वाटप केले जाते. या उपक्रमाअंतर्गत यंदा अंबापेठ जैन स्थानक व बडनेरा येथील अरिहंत इलेक्ट्रिक केंद्रातून एकूण ४१३४० प्रो नोटबुक व रजिस्टरचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत १७२३ विद्यार्थ्यांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमाची उपयुक्तता लक्षात घेता ग्रामीण विद्यार्थ्यांनाही याचा लाभ मिळावा, यासाठी बडनेरातही वह्यांचे वितरण करण्यात आले. अंबापेठ येथे संध्याकाळी ६ ते ८ आणि बडनेऱ्यात दुपारी ४ ते ६ दरम्यान हे वाटप झाले. एका आधार कार्डवर जास्तीत जास्त दोन डझन वह्यांचे वितरण करण्यात आले. उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना जुन्या वर्तमानपत्रांसह रद्दी साहित्य आणण्याचे आवाहन करण्यात आले होते, ज्याला चांगला प्रतिसाद मिळाला. उत्कृष्ट प्रतीचे कव्हर, वर्षभर उपयोगी पडणारी क्वालिटी आणि सवलतीचा दर यामुळे 'प्रो बुक' विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरली आहे. गुरुदेवांच्या प्रेरणेतून अर्हम सेवकांच्या अथक परिश्रमांमुळे हा उपक्रम यशस्वी ठरला.

# चांदूर रेल्वेत ६३ हजारांची घरफोडी

**अमरावती :** चांदूर रेल्वे ठाण्याच्या हद्दीतील पात्रीकर कॉलनी येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून ६३ हजारांचा ऐवज लंपास करण्यात आला. ही घटना ४ जून रोजी उघडकीस आली. पात्रीकर कॉलनी येथील रहिवासी प्रवीण दिवाकर इंगळे (५२) हे कुटुंबासह लग्नाकरिता धानोरा म्हाली येथे गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांचे घर फोडून कपाटातील ६३ हजारांचा ऐवज लंपास केला. ही बाब लक्षात आल्यावर प्रवीण इंगळे यांनी चांदूर रेल्वे ठाण्यात तक्रार दाखल केली.

# लहाळके, शेलार, मानकर, यादव यांची ब्रजवासी गौ रक्षण सेना भारतमध्ये नियुक्ती

## राष्ट्रीय कार्यकारिणी अध्यक्ष अतुल इंगळे यांच्या नेतृत्वात प्रवेश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती(दि.१०)**– ब्रजवासी गौ रक्षण सेना भारत चे राष्ट्रीय कार्यकारिणी अध्यक्ष अतुल इंगळे यांच्या नेतृत्वाखाली अनेक समाजसेवकांची विविध पदावर नियुक्ती केली जात आहे. नुकतीच रामानंद लहाळे, संदीप शेलार, नितीन मानकर व सुरज यादव यांची ब्रजवासी गौ रक्षण सेना भारतच्या विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. ब्रजवासी गौ रक्षक सेना भारत या संस्थेचे मुख्य काम गौ मातांची सेवा आणि संरक्षण करणे आहे. ते अनाथ आणि जखमी गाईना मदत करतात आणि त्यांच्यासाठी योग्य व्यवस्था करतात. या संस्थेतील सदस्य गौ मातांच्या सेवेला आपले परम कर्तव्य मानतात. अनाथ गार्यीना मदत आणि जखमी गाईना आश्रय, गौ मातेची सेवा करणे आणि त्यांचे संरक्षण करणे.गौ रक्षण आणि गौ सेवा याबद्दल जनजागृती करणे, गौ मातेचे संरक्षण करण्यासाठी काम करणे, जसे की बेकायदेशीर वाहतूक आणि मारामारी रोखणे, याबाबतीत ही संस्था कार्य करते. या संस्थेचेराष्ट्रीय अध्यक्ष मा संत धर्मदास महाराज, राष्ट्रीय सचिव प्रेम किशोर गंगवार, उत्तरप्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वात ब्रजवासी गौ रक्षण सेना भारत चे काम चालते. या पदाधिका:यांच्या मार्गदर्शनात ब्रजवासी गौ रक्षक सेना भारत चे राष्ट्रीय कार्यकारिणी अध्यक्ष अतुल इंगळे यांच्या नेतृत्वात रामानंद लहाळके यांची राष्ट्रीय प्रमुख मंत्री, संदीप शेलार यांची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष,सुरज यादव यांची महाराष्ट्र युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष व नितीन मानकर याची विदर्भ अध्यक्ष अशा प्रकारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यांच्या नियुक्तीमूळे संस्थेच्या कामाला महाराष्ट्रात आणखीन गती मिळणार असल्याचा विश्वास अतुल इंगळे यांनी व्यक्त केला आहे.



# छत्री तलाव परिसरात स्वच्छता मोहिम राबवून पर्यावरण दिन साजरा

## बँक ऑफ बडोदा क्षेत्रीय कार्यालयाचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १०)**–बँक ऑफ बडोदाच्या क्षेत्रीय कार्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने छत्री तलाव परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, डब्बे, पिशव्या आणि इतर कचरा गोळा करून योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली. ही संपूर्ण मोहिम क्षेत्रीय प्रबंधक राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी उपक्षेत्रीय प्रबंधक संजीव श्रीवास्तव, इतर अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छतेत आपला मोलाचा सहभाग दिला. या वेळी राजेश कुमार म्हणाले, स्वच्छता ही आपली नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे केवळ शासनाचीच नव्हे तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो आणि कर्मचा?यांमध्ये पर्यावरणास अनुकूल वर्तनाची जाणीव निर्माण होते. पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

# तिघांकडून ५६ हजाराची विजचोरी उघड

- बडनेरा पोलिस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल
- महावितरणची धडक कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.१०)** – महावितरणकडून सुरू असलेल्या विजचोरीविरोधातील मोहिमेत अमरावती शहरातील बिच्छुटेकडी, वडाळी आणि अमरावती परिसरात तीन वेगवेगळ्या विजचोरीचे प्रकार उघड करण्यात आले आहेत. या तिन्ही कारवाईत तिघांनी मिळून ५६ हजार ४४३ रुपयांची विजचोरी केल्याचे निष्पन्न झाले असून, सात जणांविरुद्ध बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मो. अमिन मो. शफिक (रा. बिच्छुटेकडी) याने विज पोलवर आकोडा (तार) टाकून अनधिकृतपणे ४५२ युनिट विज वापर केली. या विजेची एकूण किंमत ११ हजार ७६३ रुपये इतकी असून, महावितरणच्या तक्रारीनंतर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जगदेव शामराव थोरात (रा. वडाळी) याने बिनानंबरचे मीटर बसवून विजेचा वापर सुरू ठेवला होता. त्याला महावितरणकडून बिलही येत नव्हते. त्याने ९३६ युनिट विज (१७३४० रुपये किंमतीची) चोरी केली होती. सचिन माणिकराव चव्हाण याने सुद्धा पोलवर आकोडा टाकून अनधिकृतपणे विज वापर केला. यामुळे महावितरणचे २२५६ युनिट विजेचे (३६४४० रुपये किंमतीचे) नुकसान झाले. या तिन्ही प्रकरणांमध्ये महावितरणचे सहायक अभियंता मुकेश उमाकांत माळेगावकर (वय ४७) यांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, एकूण सात जणांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# अल्पवयीन मुलीला पळविले

**अमरावती :** एका अल्पवयीन मुलीला पळविण्यात आले. ही घटना कोतवाली ठाण्याच्या हद्दीत ४ जून रोजी उघडकीस आली. एक १६ वर्षीय मुलगी ही रात्रीच्या वेळी कुटुंबातील कुणाला काहीही न सांगता घरुन निघून गेली. सकाळी ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाइकांकडे विचारणा करण्यात आली. मात्र, तिचा पत्ता लागला नाही.

# एसटी डेपो येथील जलसेवाधारी गोपाल राठी यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.१०)** – गोविंदा मित्र परिवार २ च्या वतीने अलीकडेच जलसेवाधारी गोपाल राठी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. समाजात सेवा करणारे अनेक महानुभाव आहेत, परंतु सायत येथील रहिवासी गोपाल राठी यांनी निस्वार्थ भावनेने अनेक वर्षांपासून सेवा देऊन आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



एस.टी. डेपो परिसरात जय गोविंदा मित्र परिवार – २ चे सदस्य एकत्र जमून प्रथम सीतारामदास बाबांच्या तैलचित्राची आरती करण्यात आली.

त्यानंतर गोपाल राठी यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नंदकिशोर राठी, अनिल नरेडी, कमल मालानी, बंकटलाल राठी, ओमप्रकाश चांडक, एड. देवकिसन टवानी, रामेश्वर गग्गड, अशोक सोनी, गोपाल चांडक, श्यामप्रकाश गिल्डा, विजय केडिया, श्रीकिसन व्यास, मधु करवा, वीरेंद्र शर्मा, संजयकुमार राठी, एड नंदकिशोर कलंत्री, एड. आकाश मालू, सुरेश राठी, राजेश मितले, संजय अग्रवाल, नरेश तिवारी, एन. टी. राठी, मनमोहन जाजू, डॉ.राजेश चांडक, विजय अग्रवाल, घनश्याम वर्मा, सुशील सारडा, मोहित सारडा, आनंद सोनी, उर्मिला कलंत्री आदी उपस्थित होते.

# माजी आमदारांनी दांडी बहाद्दरांना धरले धारेवर

## धारणीतील शासकीय कार्यालयांवर 'सर्जिकल स्ट्राइक' ■ वेतन कपातीचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,(दि.१०)** – मेळघाटातील शासकीय कार्यालयांमधील अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची सततची अनुपस्थिती हे अनेक आदिवासी बांधवांच्या तक्रारीचे मूळ कारण ठरत असताना, भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी सोमवारी शासकीय कार्यालयांवर थेट धडक देत हजेरी पट तपासले, यामध्ये गैरहजर दांडी बहाद्दरावर कारवाईचा इशारा त्यांनी दिला.

शासकीय कामासाठी १००–१५० किमी अंतरातून धारणी शहरात येणाऱ्या आदिवासी नागरिकांना अनेक वेळा 'कुलूपबंद' कार्यालयांचे दर्शन घडते. या पार्श्वभूमीवर भिलावेकरांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी पीडब्ल्यूडी, मृद व जलसंधारण, भूमी अभिलेख, पंचायत समिती, तहसील कार्यालय, नगरपंचायत अशा प्रमुख विभागांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन कर्मचारी उपस्थितीची पाहणी केली. यावेळी अनेक कार्यालये बंद अवस्थेत असल्याचे, तसेच कर्मचारी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले.



### ७ पैकी ३ कर्मचारी हजर

या पाहणीत पीडब्ल्यूडी विभागातील अभियंते अनुपस्थित होते, तर काही कार्यालये कायम बंद असतात, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. भूमी अभिलेख कार्यालयात ७ पैकी फक्त ३ कर्मचारी उपस्थित होते. पंचायत समितीत १० कर्मचारी कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित होते. माजी आमदार भिलावेकर यांनी संबंधित विभाग प्रमुखांना गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाई करत वेतन कपात करण्याची सूचना दिली आहे.

पंचायत समितीतील १० कर्मचारी न सांगता अनुपस्थित आहेत. त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली जाईल. खुलासा घेऊन पुढील कारवाई केली जाईल.
विजय गायकवाड,
गटविकास अधिकारी, धारणी.

अभियंता भगत यांच्या विवाहामुळे आणि नवघरे यांची बैठक असल्याने ते अनुपस्थित होते. उर्वरित कर्मचा?यांबाबत माहिती घेतो.
**प्रमोद वानखडे,**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर**

### स्वतंत्र आदिवासी आयोगामुळे जीवनमानात क्रांती येणार – प्रभुदास भिलावेकर

देशातील आणि राज्यातील आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण आणि विकासकामांना गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने नुकतीच स्वतंत्र आदिवासी आयोग स्थापन केला आहे. यामुळे मेळघाटसारख्या आदिवासी भागात सकारात्मक परिवर्तन घडेल, असा विश्वास माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. कुपोषण, मातामृत्यू व बालमृत्यूसारख्या समस्या दूर होतील, विकास योजनांवर थेट लक्ष ठेवले जाईल, आदिवासी समाजाशी संबंधित निर्णय अधिक प्रभावीपणे घेतले जातील, तक्रारी व अडचणींसाठी एक समर्पित मंच उपलब्ध होईल. ही घोषणा केवळ घोषणापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीसह समाजाच्या प्रत्येक घटकाला दिलासा देणारी ठरेल. आयोगाच्या कामात पारदर्शकता आणि जलदगती आवश्यक आहे. असे यावेळी प्रभुदास भिलावेकर म्हणाले. यावेळी भाजपचे श्याम गांगराडे, दुर्गा बिसंद्रे, विवेक नवलाखे, कमलेश जैस्वाल, बन्सी शेलुकर, दीपक मालवीय यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करा

## विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल | विभागीय लोकशाही दिनात १९ प्रकरणांवर सुनावणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.१०)**–विभागीय लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. विभागाला प्राप्त होणाऱ्या प्रकरणांच्याबाबत मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागांना आज येथे दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १९ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजू फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते. यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १९ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून पाच प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभाग प्रमुखांना केल्या. विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या ६ स्वीकृत व १३ अस्वीकृत अशा एकूण १९ अर्जांपैकी सविस्तर चर्चेअंती पाच प्रकरणे निकाली काढण्यात आलीत. लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल तत्काळ सादर करण्यात यावा. तक्रार अयोग्य असल्यास खारिज करुन संबंधितांना कळविण्यात यावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी संबंधितांना केल्या. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना सिंघल यांनी यावेळी केल्या.

# हायवे लगत अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळला

## मोशी पोलीसांकडून ओळख पटविण्याचा प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.१०)** – मोर्शी पोलीस ठाणे हद्दीतील मायवाडी गावाजवळील हायवे रस्त्यालगत अंदाजे ३५ ते ४० वयोगटातील अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.मृत व्यक्तीच्या अंगावर हिरव्या रंगाचा हाफ बाह्याचा टी-शर्ट असून, टीशर्टवर छातीच्या डाव्या बाजूस 'प्रभात गोल्ड चहा' असे लिहिलेले आहे. त्याचबरोबर काळसर चेक्स पॅन्ट आणि उजव्या हाताच्या मनगटावर लाल व काळ्या रंगाचा धागा असल्याचे



निरीक्षणात आले आहे. सदर मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. त्यामुळे कोणी व्यक्ती या वर्णनाशी जुळणा?्या व्यक्तीस ओळखत असल्यास, त्यांनी तात्काळ मोर्शी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्काकरिता नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक – ९९२३०४२५६५, एपीआय लक्ष्मण चिंचोले – ९०८२१७८९१३, पोहेकॉ. निलेश देशमुख – ९७६४३८९०९५ हे भ्रमणध्वनी क्रमांक देण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करत असून, मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# निवडणूक प्रक्रीया : प्रभाग रचनेचे काम सुरूकरा

## नगरविकास विभागाचे महापालिकेला आदेश

## ४ सदस्यीय प्रभाग रचना असणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.१०)** – राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगूल वाजले असून, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नगरविकास विभागाने महापालिकांसाठी प्रभाग रचना करण्याचे आदेश काढले आहेत. त्यानुसार, अ, ब, क वर्ग महापालिकांसाठी ४ सदस्यांचा प्रभाग असणार आहे. प्रभागाचे प्रारूप तयार करणे आणि सदस्यसंख्या निश्चित करून प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी महापालिका आयुक्तांवर असणार आहे. नगरविकास विभागाकडून मंगळवारी याबाबतचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यामुळे मागील तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रक्रियेला अखेर सुरुवात झाली आहे.





मंगळवारी सायंकाळी अमरावती महापालिका प्रशासनाला सदर चे पत्र प्राप्त झाल्याची माहिती आहे.

या प्रभाग रचनेसाठी सप्टेंबर २०२२ मध्ये निश्चित केलेली कमाल आणि किमान सदस्य संख्या कायम असणार आहे. शासनाच्या या आदेशानुसार राज्यातील अ, ब, क व ड वर्ग असलेल्या महापालिकांचा यामध्ये समावेश आहे. ही प्रभाग रचना करण्यासाठी शासनाकडून नियामवली देण्यात आली असून, त्यानुसारच प्रभाग रचना करणे अपेक्षित आहे. त्यासाठी नजीकच्या जाहीर झालेल्या लोकसंख्येचा आधार घेतला जाणार आहे. त्यानुसार प्रारूप प्रभाग रचना करून महापालिका आयुक्तांनी ती निवडणूक आयोगास सादर करायची आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना सर्व आयुक्त



आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

शेवटचा प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचा –

प्रभाग निश्चित करताना सदस्यसंख्या सप्टेंबर २०२२ च्या आदेशाप्रमाणे असणार आहे. या आदेशात कमाल आणि किमान किती सदस्य असावेत, हे निश्चित केले आहे. मात्र, त्याच वेळी सर्व प्रभाग चार सदस्यांचे करायचे असून, ते होत नसल्यास एक प्रभाग तीन सदस्यांचा, तर एक प्रभाग ५ सदस्यांचा करायचा आहे. दोन प्रभाग प्रत्येकी ३ सदस्यांचे करण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र, ती करताना भौगोलिक सलगता राखणे, नागरिकांची गैरसोय टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रभागाची लोकसंख्या निश्चित करण्याचे निकषही महापालिकेस देण्यात आले आहेत. प्रभाग रचना उत्तरेकडून सुरू करून ती उत्तर पूर्वेकडून पश्चिम आणि शेवट दक्षिणेकडे करण्याच्या सूचना आहेत, तर सीमारेषा मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर रस्ते, रेल्वे रूळ, फ्लाय ओव्हर अशा मर्यादा घेऊन निश्चित केल्या जाणार आहेत. प्रभागांचे नकाशे गुगल मॅपवर तयार केले जाणार आहेत.

### असे असतील प्रभाग रचनेचे टप्पे –

- प्रारूप प्रभाग रचना करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यते पाठविणे महापालिका आयुक्त
- प्रारूप रचनेस मान्यता देणे– राज्य निवडणूक आयुक्त
- प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे – महापालिका आयुक्त
- प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना घेणे – प्राधिकृत अधिकारी
- अंतिम प्रस्ताव निवडणूक आयोगास पाठविणे – प्रधिकृत अधिकारी (आयुक्तांच्या मार्फत)
- अंतिम रचनेस मान्यता देणे – निवडणूक आयोग
- अंतिम रचना जाहीर करणे – महापालिका आयुक्त

# बडनेरा पोलिसांची अवैध दारूवर कारवाई

## दोघांना अटक | ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.१०)** – बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारूची वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्यानंतर पोलिसांनी केलेल्या कारवाईत दोन इसमांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून सुमारे ७० हजार ६०० रुपयांचा अवैध दारूचा साठा आणि दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

गुप्त सूचनेच्या आधारे सदर कारवाई मंगळवारी करण्यात आली. पोलिसांना दोन तरुण दुचाकीवरून जाताना आढळून आले. त्यांना अडवून तपासणी केली असता, त्यांच्या जवळील पोत्यांमध्ये अवैध देशी दारू आढळून आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे रोहित अरविंद वानखडे (वय २६) रा. राहुल नगर, जुनी वस्ती, बडनेरा आणि आकाश नारायण हिवराळे (वय २८) रा. पाचबंगला, जुनी वस्ती, बडनेरा अशी आहेत.

सदर मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला असून, एकूण ७०,६०० रुपये किमतीचा दारू साठा आणि दुचाकी असा ऐवज जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) नुसार बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त सागर पाटील, सहायक आयुक्त कैलास पुंडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सचिन माकोडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी सुधीर प्रांजळे, इरफान रायलीवाले, शशी शेळके, धनराज ठाकूर, बाबूसिंग राठोड व शुभम कडूकार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# आरडी एजंटला लुटल्याप्रकरणातील एकाला अटक, एक पसार

**गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.१०)**– बुधवारा टाकसाल परिसरातील एसबीआय एटीएममध्ये घुसून आरडी एजंटकडील ३० हजार रुपये हिसकावून पळ काढणा?्या आरोपींपैकी एकाला गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. मात्र, दुसरा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

८ जूनच्या रात्री पोस्ट ऑफिसमध्ये आरडी खाते चालवणारे एजंट अरविंद जहांगीरदार हे बुधवारा परिसरातील एसबीआय एटीएममधून तीनवेळा प्रत्येकी १० हजार रुपये काढून एकूण ३० हजार रुपये मोजत होते. याचवेळी अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील एक युवक एटीएममध्ये धडकला आणि त्यांच्या हातातील रक्कम हिसकावून बाहेर थांबलेल्या दुचाकीस्वाराकडे जाऊन माताखिडकीकडे पळून गेला. या घटनेनंतर अरविंद यांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. प्राथमिक तपास सुरू असतानाच गुन्हे शाखेच्या युनिट १ ने स्वतंत्र तपास सुरू केला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यातून संशयितांची हालचाल लक्षात घेऊन गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी चेतन हिरालाल प्रधान (वय २५, रा. परदेशीपुरा, महाजनपुरा, अमरावती) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. दुसरा आरोपी अंकुश कोठार अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक आयुक्त कल्पना बारवकर व जयदत्त भवर, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तपास पथकात मनीष वाकोडे, प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाले, प्रशांत मोहोड, अलीमुद्दीन खतीब, नाझिमुद्दीन सय्यद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, रंजीत गावंडे, अशोक खंगार आणि किशोर खेंगरे यांचा समावेश होता.

# एटीएम कार्डाची अदलाबदली करून २६ हजारांने गंडविले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.१०)** – शहरातील राठी नगर परिसरात एटीएममध्ये कार्डाची अदलाबदली करून २६ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. ही फसवणूक ८ जून रोजी रात्री घडली असून, कैलास श्रीकृष्ण शेलार (वय ४७, रा. पुंडलिकबाबा नगर, अमरावती) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिस ठाण्यात अज्ञात दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कैलास शेलार हे राठी नगर येथील बळीराम राठोड यांच्या घरी भाड्याने राहतात. ८ जून रोजी रात्री सातच्या सुमारास ते राठी नगर येथील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते.

त्याचवेळी तेथे दोन अनोळखी तरुण उपस्थित होते. त्यांनी मदतीच्या बहाण्याने शेलार यांना ङ्गहा बटन दाबाङ्ख, ङ्गपिन टाकाङ्ख असे म्हणत एटीएम ऑपरेट करायला सुरुवात केली. शेलार यांनी पिन टाकल्यानंतर स्क्रीनवर खात्यात २६ हजार ६२५ रुपये शिल्लक असल्याचे दिसले. त्यांनी पुन्हा कार्ड घालून १० हजार रुपये काढण्याचा प्रयत्न केला, मात्र व्यवहार अयशस्वी झाला. दरम्यान, ते दोघे आरोपी काहीही न सांगता तिथून निघून गेले. थोड्याच वेळात शेलार यांच्या मोबाईलवर २० हजार रुपये काढल्याचा मेसेज आला. यानंतर त्यांना आपल्या कार्डाची अदलाबदली झाल्याचा संशय आला. खात्यातून एकूण २६ हजार रुपये काढून त्यांची फसवणूक करण्यात आल्याचे त्यांनी पाहिले. या प्रकरणी शेलार यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# कंत्राटदारांच्या पापात सहभागी होऊन शहराचा सत्यानाश करूनका !

## खासदार बळवंत वानखडे | कचऱ्यावरुन महापालिकेत काँग्रेस चे रणकंदन





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.१०)**– अमरावती शहरात घनकचऱ्याच्या वाढत्या समस्येमुळे अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, महापालिकेच्या ढिसाळ नियोजनावर काँग्रेसने तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. 'कंत्राटदारांच्या पापात सहभागी होऊन शहराचा सत्यानाश करू नका,' असा रोष व्यक्त करत खासदार बळवंत वानखडे यांनी प्रशासनाला इशारा दिला. महापालिकेतील बैठकीत काँग्रेस नेत्यांनी घनकचरा व्यवस्थापनातील गलथान कारभारावरून अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली.



या बैठकीत माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, बाळासाहेब भुयार, आणि अनेक काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह महापालिका अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांनी शहरातील अकॅडमिक स्कूल, पठाण चौक, ऑक्सिजन पार्क, स्मशानभूमी, वडाळी आकाशवाणी परिसर याठिकाणी साचलेल्या कचऱ्याची गंभीर परिस्थिती सचित्र मांडली.

### कचरा उचलण्याची प्रक्रीया सुरु

अमरावती शहरातील कच:याची परिस्थिती दैनिक महासागर ने गेल्या चार दिवसांपासून वाचकांसमक्ष मांडून प्रशासन व लोकप्रतिनिधींची झोप उडविली आहे. याची फलश्रुती मंगळवारी(दि.१०)शहरातील कचरा उचलण्याच्या प्रक्रीयेला वेग आला. शहराच्या अनेक भागात साचलेला कचरा उचलणे सुरु झाले होते, मात्र याकरिता कर्मचारी कमी लावलेले असल्याचे आढळून आले.



### शहराच्या कानाकोपऱ्यात डंपिंग यार्ड

केंद्र आणि राज्य सरकारकडून 'स्वच्छ भारत' अभियान राबवले जात असले तरी अमरावतीत मात्र डंपिंग यार्ड शहराच्या प्रत्येक कोप?्यात निर्माण झाले आहेत. कंत्राटदारांनी मनमानी पद्धतीने कच?्याचा साठा वाढवून शहराची बदनामी चालविली आहे. आश्चर्य म्हणजे या कंत्राटदारांकडून ठराविक सफाई कर्मचारी नसतानाही महापालिकेने त्यांना अभय दिले आहे. महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी हे राजकीय दबावाखाली काम करत असल्याचे स्पष्ट दिसून येते, अशी टीका काँग्रेसने केली. एकूण पाच झोनमध्ये सफाईच्या कामावर कुठलाही नियंत्रण नसून, निरीक्षकही निष्क्रिय असल्याचे निदर्शनास आले. अनेक ठिकाणी स्वच्छता कामगारांची कमतरता असूनदेखील कंत्राटदारांना मोठी रक्कम अदा केली जात आहे. असेही सांगण्यात आले.

### चुकीच्या कारभाराला समर्थन शहराचा विनाश

खा.बळवंत वानखडे यांनी या सगळ्या परिस्थितीवर नाराजी व्यक्त करत स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'महानगरपालिका जर कंत्राटदारांच्या चुकीच्या कारभाराला समर्थन देत असेल, तर ती थेट शहराच्या विनाशात हातभार लावत आहे. हे थांबले पाहिजे.' यावर त्वरित उपाययोजना करावी, दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. शहरातील नागरिकांनीही आपल्या परिसरातील अस्वच्छतेबाबत तक्रारी व्यक्त करत समाधानकारक उत्तरांची मागणी केली. यावर आयुक्त व अधिकाऱ्यांना युद्धस्तरावर काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.शहरात स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेने जबाबदारीने व पारदर्शकतेने काम करावे, अन्यथा जनतेसमोर उत्तर द्यावे लागेल, असा इशारा काँग्रेस नेत्यांनी दिला. बैठकीत अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वच्छ अमरावतीसाठी ही बैठक निर्णायक ठरणार असल्याची चिन्हे आहेत.

# तळीरामांची चपटी महागली!

- देशी दारू८० रुपयात; तळीराम कोमात
- मंत्रिमंडळाकडून उत्पादन शुल्कात वाढ







**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि. १०)** – राज्य शासनाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने मद्यविक्रीवरील करात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे देशी दारूच्या एका पावटी किंवा चपटीसाठी (१८० मिली) आता ८० रुपये मोजावे लागणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे तळीरामांना चांगलाच धक्का बसला असून 'मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण योजना बहिणीच्या नव?्याला महागात पडली', अशी उपरोधिक चर्चा रंगली आहे.

अलीकडेच विदेशी बिअर ७५ टक्के स्वस्त होणार असल्याचे वृत्त माध्यमांमध्ये झळकले होते, ज्याने मद्यप्रेमींमध्ये आनंदाची लाट निर्माण केली होती. मात्र राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत उत्पादन शुल्कात वाढ करून सर्व प्रकारच्या दारूवर दरवाढ लागू केली गेली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे सरकारी तिजोरीत १४,००० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल जमा होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. राज्यातील सामान्य तळीरामांपासून उच्चभ्रू मद्यप्रेमींपर्यत सर्वांनाच या निर्णयाचा फटका बसणार आहे, हे निश्चित!

### नविन पदभरती होणार

तसेच, उत्पादन शुल्क विभागात १२२३ पदे नव्याने भरली जाणार असून, मद्यविक्रीवर अधिक संपूर्ण देखरेख ठेवण्यासाठी हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना कराराच्या आधारे परवानगी देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यावर १०-१५% अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. मद्यप्रेमींनी आधीच दरवाढीमुळे नाराजी व्यक्त केली असून, ङ्गक्वार्टर महाग झाली, सेलिब्रेशनचं बजेटच कोलमडलं,ङ्ख अशा प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत. दुसरीकडे सरकार महसूल वाढीसाठी ठोस पावले टाकत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### नवीन दरानुसार १८० मिली मद्याची किरकोळ विक्री किंमत

| | | |
|---|---|---|
| देशी दारू | – | ८० रु. |
| महाराष्ट्रमेड लिकर | – | १४८ रु. |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य | – | २०५ रु. |
| विदेशी प्रीमियम ब्रँड | – | ३६० रु. |

# सुनील खराटे यांचा भाजपमध्ये प्रवेश

## उबाठा शिवसेनेला धक्का



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.१०)**– शहरातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ता आणि स्थानिक राजकारणातील सक्रीय व्यक्तिमत्त्व सुनील खराटे यांनी आज अधिकृतपणे भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात त्यांनी भाजप प्रवेशाची घोषणा केली. सुनिल खराटे हे गेल्या अनेक वर्षापासून उबाठा शिवसेनेशी बांधील होते.

त्यामूळे गेल्या विधानसभा निवडणूकीत त्यांना बडनेरा मतदार संघातून शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली होती. खराटे यांचा भाजपमध्ये प्रवेश स्थानिक उबाठा शिवसेनेला धक्का समजला जात आहे. आपल्या निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना खराटे यांनी भाजपचे स्थिर नेतृत्व, विकासाभिमुख धोरणे व राष्ट्रीय विचारसरणी यांचा विशेष उल्लेख केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व हे देशासाठी आश्वासक असून, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्या कार्यक्षमतेमुळे मला राष्ट्रहितासाठी अधिक व्यापक स्वरूपात काम करण्याची संधी मिळेल,ङ्ख असे ते म्हणाले.

### विकासाला प्राधान्य, स्थानिक प्रश्नांवर कटिबद्धता

सुनील खराटे यांनी अमरावती शहरातील बांगलादेशी नागरिकांचे खोट्या कागदपत्रांद्वारे वास्तव्य या गंभीर विषयावर लक्ष वेधले. ङ्गया प्रश्नावर मी आधीपासून आवाज उठवत होतो, पण विरोधी पक्षात असल्याने माझ्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले. आता भाजपमध्ये सामील झाल्यानंतर या विषयावर मी ठोस पावले उचलणार आहे,ङ्ख असे ठामपणे त्यांनी सांगितले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# चांदूर बाजारमध्ये मुंडण, जलसमाधी आंदोलन

## बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला राज्यभरातून जोरदार पाठिंबा

### प्रशासनाची उदासीनता कायम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.१०) –** शेतकरी कर्जमाफीसह १७ मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी ८ जूनपासून मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या या आंदोलनाला गावागावांतून, विविध संघटनांतून आणि राजकीय नेत्यांकडून जोरदार पाठिंबा मिळत असून आंदोलन आता राज्यव्यापी होताना दिसत आहे.

या आंदोलनाच्या तिस?्या दिवशीदेखील प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल न घेतल्यामुळे चांदूर बाजार तालुक्यातील शेकडो शेतकरी, दिव्यांग, निराधार नागरिक आणि प्रहार कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर धडक दिली. त्यांनी मुंडण आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी संतोष किटुकले, दीपक भोंगाडे, प्रदीप बंड, राहुल खापरे, गजानन ठाकरे यांच्यासह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते. यावेळी तहसीलदार यांना निवेदनही देण्यात आले.





### उद्या चूलबंद : राज्यभरातून पांठीब्याची झोड

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राष्ट्रीय शेतकरी नेते राकेश टिकैत, माजी मंत्री विश्वजित कदम, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार गजानन लेवटे, आमदार कैलास पाटील, आमदार डॉ. राहुल पाटील, प्रवीण स्वामी, रविकांत तुपकर यांच्यासह अनेक नेत्यांनी पाठिंबा दिला आहे. दरम्यान, उद्या ११ जून रोजी अचलपूरमधील महिलांनी वटपौर्णिमेच्या निमित्ताने 'चूल बंद' आंदोलन जाहीर केले आहे. तसेच बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ चांदूर बाजार येथील व्यापाऱ्यांनीदेखील आपापली दुकाने सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आंदोलनाची तीव्रता आणि लोकांचा पाठिंबा पाहता, प्रशासन आणि सरकारने तातडीने निर्णय घेणे आवश्यक झाले आहे, अन्यथा आंदोलन चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### ८० वर्षाचा आंदोलक जलसमाधी आंदोलनात



दरम्यान, विश्रोळी येथील पूर्णा मध्यम प्रकल्पात मंगेश देशमुख यांनी जलसमाधी आंदोलन सुरू केले. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या गंभीर आंदोलनात ८० वर्षीय शेतकरी जनार्दन राऊत यांच्यासह रवि पाटील, अक्षय औतकर, प्रफुल नवघरे, अनिल नवघरे, दादाराव देशमुख, मोहित देशमुख, अतुल ठाकरे, बबनराव झटले, हेमंत मोरांडे, दिनेश आमझरे, भगवंत दामोदर, वणी येथील शेतकरी जनार्दन राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेतला. सुमारे पाच ते सहा तास प्रशासन शांतच होते, मात्र नंतर जिल्हाधिका?्यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचे आवाहन केले. आंदोलकांनी याला प्रतिसाद दिला, परंतु लवकरात लवकर बच्चू कडू यांच्या मागण्यांबाबत निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. यावेळी तहसीलदारांनी जनार्दन राऊत यांच्या समस्येवर तत्काळ कार्यवाही केली आणि इतरही निराधारांच्या समस्यांचे निवारण लवकर करण्याचे आश्वासन दिले.

# वटपौर्णिमेला वडाचे झाड लावून रणरागिनी ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी

## स्मशानभूमीत वृक्षारोपण करून दिला पर्यावरण व स्त्री सक्षमीकरणाचा संदेश

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.१०) –** परंपरेला नव्याने अर्थ देत वरुड शहरातील रणरागिनी महिला ग्रुपने यंदाची वटपौर्णिमा आगळीवेगळी पद्धतीने साजरी केली. त्यांनी हिंदू स्मशानभूमीत वडाचे झाड लावून हा सण साजरा करत समाजात सकारात्मक संदेश दिला. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



सामान्यतः वटपौर्णिमेच्या दिवशी विवाहित स्त्रिया वडाच्या झाडाभोवती फेऱ्या घालून आपल्या पतीच्या दीर्घायुष्याची कामना करतात. मात्र रणरागिनी ग्रुपने या पारंपरिक साजरीकरणाच्या पलीकडे जाऊन पर्यावरण रक्षण आणि सामाजिक बांधिलकी यावर लक्ष केंद्रित केले. या महिलांनी स्मशानभूमीत जाऊन वृक्षारोपण करून वडाच्या झाडाची पूजा केली. या अभिनव उपक्रमाद्वारे त्यांनी ङ्गपरंपरेला आदराने नव्याने साजरे करण्याचा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारण्याचा संदेशङ्ग दिला. रणरागिनी ग्रुप विविध समाजोपयोगी कार्यांमध्ये सक्रिय असून त्यांनी यापूर्वीही विधवा महिलांसाठी 'हळदी कुंकू' उपक्रम, महिलांवरील अत्याचाराविरोधात जनजागृती यासारखे उपक्रम राबवले आहेत. ग्रुपच्या नेत्या सोनल चौधरी यांनी 'सण साजरे करताना समाजासाठी काहीतरी चांगले करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. महिला कोणत्याही संकटात असतील, तर आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहू' असे मत व्यक्त केले. या वेळी सोनल अग्रवाल, प्रज्ञा बोडखे, अरुणा बेहरे, माधुरी भगत, वंदना बेलसरे, दीपा जावरकर, प्रतीक्षा खापरे व प्रभाबाई यांनी देखील सहभाग नोंदवला. रणरागिनी ग्रुपच्या या उपक्रमामुळे स्त्री सक्षमीकरणासोबतच पर्यावरण रक्षणाचाही संदेश समाजात पोहोचला असून, त्यांची ही सामाजिक जाणीव प्रेरणादायी ठरत आहे.



# विजेचा धक्का लागून मृत पावलेल्या महिलेच्या नातेवाईकांना आर्थिक मदत

## महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण

**महासागर प्रतिनिधी**

**मोशी,(दि.१०) –** तालुक्यातील राजुरवाडी येथे विजेचा धक्का बसून मृत पावलेल्या २५ वर्षीय प्रिया जानरावजी पारिसे यांच्या कुटुंबाला महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी आर्थिक व तांत्रिक मदत करून सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे.

२ जून रोजी प्रिया पारिसे या पिण्याच्या पाण्याची मोटार सुरू करताना विद्युत प्रवाहामुळे मृत्युमुखी पडल्या. त्यांच्या अपघाती निधनाने कुटुंबावर दुःख व आर्थिक संकट कोसळले. वृद्ध आई-वडिलांवर जबाबदारी असलेल्या या कुटुंबाला मदतीची गरज होती. या पार्श्वभूमीवर मोशी उपविभाग व राजुरवाडी वीज वितरण केंद्रातील महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आर्थिक मदत जमा केली. एकूण ६३,५०० रुपयांची मदत कार्यकारी अभियंता विजय कासट यांच्या हस्ते ९ जून रोजी प्रिया पारिसे यांच्या कुटुंबीयांना चेक स्वरूपात देण्यात आली. या प्रसंगी कार्यकारी अभियंता विजय कासट यांनी उपस्थितांना विद्युत सुरक्षा, घरगुती वायरिंग करताना घ्यावयाची खबरदारी, व भविष्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी घरगुती विद्युत उपकरणांचा योग्य वापर, नियमित तपासणी आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून काम करून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी लेहगाव वीज वितरण केंद्राचे सहायक अभियंता तथा प्रभारी उपकार्यकारी अभियंता कल्पेश देवांग, नेरपिंगळाई वीज वितरण केंद्राचे सहायक अभियंता कोकणे, तसेच राजुरवाडी वीज वितरण केंद्राच्या कनिष्ठ अभियंता मोना गणवीर व राजुरवाडी केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, सामाजिक बांधिलकी, सुरक्षा जागरूकता आणि मानवतेचा एक सकारात्मक नमुना आहे.

### घरातील वायरिंग केली दुरुस्त

याशिवाय घरातील विद्युत वायरिंग अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे लक्षात घेऊन, महावितरणच्या कर्मचा:यांनी संपूर्ण वायरिंगसाठी आवश्यक साहित्य स्विच बोर्ड, एमसीबी, वायर इत्यादी विनामूल्य आणून वायरिंग दुरुस्त करुन दिली. या उपक्रमामुळे भविष्यातील अपघात टाळता येईल.

# शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर शिक्षण उपसंचालकांची आज विभागीय बैठक!

## १६ जूनपासून आमरण उपोषणाची भूमिका कायम

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,(दि.१०) –** अमरावती विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रलंबित ३५ प्रमुख समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रहार शिक्षक संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेने विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांना निवेदन देत १६ जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. याची गांभीर्याने दखल घेत आज ११ जून रोजी दुपारी ४ वाजता शिक्षण उपसंचालक पातळीवर विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक शिक्षण विभागाच्या



ॲक्टिव्ह मोड मध्ये घेतली जात असून, विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी प्रहार शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, माजी आमदार बच्चू कडू यांची उपस्थिती राहणार आहे.

### ठाम भूमिका – प्रहार शिक्षक संघटना

राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी स्पष्ट केले की, शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी जर निर्णय झाले नाहीत, तर १६ जूनपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेकडो शिक्षकांसह आमरण उपोषण करण्यात येईल. शिक्षण विभागातील प्रलंबित समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली आहे.

# कैलास आवारेकडून बाजार समितीच्या कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी?

## भ्रष्टाचाराच्या तक्रारीवरून दबाव, शिवीगाळ

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि.१०)–** कृषी उत्पन्न बाजार समिती अचलपूरमध्ये कार्यरत सुपरवायझर अमर वानखडे यांना जीवे मारण्याची धमकी देत अश्लील शिवीगाळ झाल्याची गंभीर तक्रार परतवाडा पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. ही घटना बाजार समितीतील आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारीवरून घडल्याचे उघड झाले असून, आरोपींविरोधात अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तक्रारदार अमर वानखडे यांनी परतवाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या निवेदनात नमूद केलं आहे की, ६ जून रोजी कैलास आवारे आणि प्रशांत ठाकरे यांनी त्यांना सोसायटीच्या कार्यालयात बोलावून तक्रार मागे

### पोलिसात तक्रार दाखल

घेण्यासाठी दबाव टाकला. तक्रार ही बाजार समितीचे सचिव मंगेश भेटाळू यांच्यावर ६०–७० लाख रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराबाबत होती. तक्रार मागे न घेतल्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आणि शिवीगाळ करून कामात अडथळा निर्माण केला गेला, असा आरोप त्यांनी केला आहे.

सदर घटनेमुळे अमर वानखडे यांनी आपला जीव धोक्यात असल्याचे म्हटले आहे. या तक्रारीची प्रत राज्यातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत – उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधीक्षक, पणन संचालक, जिल्हा उपनिबंधक व बाजार समितीचे सभापती व सचिव यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना कैलास आवारे यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी स्पष्ट केलं की, 'अमर वानखडे यांच्याच भ्रष्ट कारभारावर मी तक्रार देण्याचा विचार करत होतो, म्हणूनच त्यांनी माझं आणि प्रशांत ठाकरे यांचं नाव घेतलं.' कैलास आवारे हे बाजार समितीच्या संचालक सौ. आवारे यांचे पती आहेत. तक्रारीत उल्लेख आहे की ते कोणत्याही अधिकृत पदावर नसतानाही कर्मचा?्याच्या कामात अडथळा निर्माण करत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे.

### महिलेचा विनयभंग करून पती, मुलाला मारहाण

**अमरावती :** एका महिलेचा विनयभंग करुन त्यांच्या पती व मुलाला मारहाण करण्यात आली. ही घटना रहिमापूर ठाण्याच्या हद्दीत ४ जून रोजी घडली. पीडित ४६ वर्षीय महिला ही घरी एकटी होती. त्यावेळी प्रशांत पुरुषोत्तम अढाऊ (४५) याने त्यांच्या घरात शिरून त्यांच्यासोबत असभ्य वर्तन केले. त्याचवेळी महिलेचा पती व मुलगा घरी आले. त्यांनी प्रशांतला घरात कसा काय आला, अशी विचारणा केली. त्यावर त्याने त्यांच्यासोबत वाद घालून त्यांना मारहाण केली. या प्रकरणी पीडित महिलेने रहिमापूर ठाण्यात तक्रार दाखल केली.

# दिराचा वहिणीवर अत्याचार

**अमरावती–** माझा भाऊ काही दिवसात मरणार आहे, त्यामुळे तू माझ्याशी लग्न कर, असे आमिष दाखवत दिराचा वहिणीवर जबरदस्ती करून अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. ही घटना २९ मे ते ८ जून २०२५ दरम्यान घडल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली आहे. पीडित २४ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी देवराविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

तक्रारीत पीडित महिलेने सांगितले की, २९ मे रोजी रात्री १० वाजता ती घरी झोपली असताना घराचा दरवाजा तुटलेला असल्यामुळे आरोपी देवर थेट घरात घुसला. त्याने पीडितेला झोपेतून उठवून शारीरिक संबंध ठेवण्याचा प्रस्ताव दिला. तुझा नवरा आता मरणारच आहे, आपण दोघं लग्न करू, असे सांगून त्याने जबरदस्तीने अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा रात्री १२ वाजता त्याने दुसऱ्यांदा शरीरसंबंध ठेवले.

# पुणे जाणाऱ्या प्रवाशांची लूट!

## खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांची मनमानी दरवाढ ■ प्रवाशांना बसतोय आर्थिक फटका



आम्हाला वेळेवर पुण्याला जायचं असतं, पण दर ऐकूनच माघारी फिरावं लागतं,– या लूटप्रवृत्तीला रोखण्यासाठी शासनाने तातडीने कठोर उपाययोजना करणे अत्यावश्यक बनले आहे.

**एक विद्यार्थी,**
**रा.अंजनगाव सुर्जी.**

**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, (दि.१०)–** उन्हाळ्याच्या सुट्ट्या, लग्नसराई आणि सणासुदीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची संख्या वाढलेली असताना, परतवाडा, चांदूरबाजार, पथ्रोट, अंजनगाव आणि बैतूल परिसरातून पुण्याकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांनी प्रवासदरात प्रचंड वाढ केली आहे. यामुळे सामान्य प्रवाशांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. जगदंबा, सिंध, गुरु गणेश, कुंदन, चिराग आणि संगीतम ट्रॅव्हल्स या लक्झरी ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या बसगाड्या दररोज पुण्याकडे धावत आहेत. वातानुकूलित गाड्यांचे दर सध्या १३०० ते१६०० रुपयांपर्यंत आहेत, तर विना एसी गाड्यांचे दरही फक्त १०० रुपयांनी कमी आहेत. विशेष म्हणजे पुण्यावरून परतीच्या प्रवासाचे दर मात्र ३०० ते ४०० रुपयांनी कमी असतात.



### प्रवाशांच्या मागण्या काय आहेत?

- प्रवासदरांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा तयार करावी
- खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांना नियमबद्ध करावे
- दरवाढीवर नियमित तपासणी करावी
- प्रवाशांसाठी तक्रार नोंदविण्याची सोय उपलब्ध करून द्यावी

### सणासुदीला लूट आणखी वाढते


दसरा, दिवाळी, गणेशोत्सव अशा काळात हेच दर २५०० ते ३००० रुपयांपर्यंत जातात. कोणताही शासकीय नियम किंवा नियंत्रण न ठेवता, केवळ मागणी जास्त आणि जागा कमी या तत्त्वावर दरवाढ केली जाते, जी सरळसरळ ग्राहकांची फसवणूक आहे.

### परिवहन विभागाची उदासीनता धक्कादायक

या मनमानी दरवाढीकडे परिवहन विभागाचे दुर्लक्ष अधिक चिंताजनक बाब आहे. ना दरवाढीवर नियंत्रण, ना गाड्यांची तपासणी – यामुळे प्रवाशांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. दरवाढ थांबवण्यासाठी आणि कंपन्यांना नियमबद्ध करण्यासाठी यंत्रणांनी तातडीने पुढाकार घ्यावा, अशी मागणी सर्वसामान्य प्रवाशांकडून केली जात आहे.

# विद्युत उपकरणांचा काळजीपूर्वक वापर करा

## कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि.१०)–** महावितरण अचलपूर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. प्रदीप अंधारे यांनी अचलपूर शहरासह उपविभागातील सर्व वीज ग्राहकांना एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. उन्हाळा आणि पावसाळ्याच्या काळात विद्युत उपकरणांचा वापर अत्यंत सावधगिरीने करावा, जेणेकरून विद्युत अपघात टाळता येतील, असे ते म्हणाले.

प्रदीप अंधारे यांनी सांगितले की, अनेकदा नागरिक चालू कुलरमध्ये ओले हाताने पाणी भरतात किंवा स्विच बोर्ड, फ्रीज यासारख्या उपकरणांना हात लावतात, त्यामुळे विद्युत शॉक बसण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा उपकरणांचा वापर करताना नेहमी सुरक्षेची काळजी घ्यावी. विशेषतः कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी त्याची वायर पिन प्लगमधून काढावी, असे त्यांनी सुचवले. घरामध्ये योग्य अर्थिंगची सुविधा असणे अत्यावश्यक आहे. ग्राहकांनी नियमितपणे मीटरचे अर्थिंग, स्विच बोर्ड व इतर विद्युत उपकरणांची तपासणी करावी. अशा काळजीने मोठे अपघात टाळता येऊ शकतात, असेही अंधारे यांनी नमूद केले.

### वीज थकबाकी भरण्याचे आवाहन

महावितरणच्या अचलपूर उपविभागांतर्गत शहर १, शहर २, कॅम्प, धारणी, चिखलदरा, अंजनगाव व दर्यापूर येथील अनेक घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांकडे लाखोंच्या थकबाकीची रक्कम आहे. संबंधित ग्राहकांनी आपली थकीत व चालू वीजबिले तात्काळ भरावीत, अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा अंधारे यांनी दिला.

